# नवोदय विद्यालय समिती

## जवाहर नवोदय विद्यालय, निवड चाचणी माहितीपत्रक 2022

## वर्ग 6 वी मध्ये प्रवेशा करिता

## नवोदय विद्यालय योजना

## प्रस्तावना

भारत सरकारने 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार जवाहर नवोदय विद्यालये सुरु केली. सध्या 27 राज्ये व 8 केंद्रशासित प्रदेशांमध्ये जवाहर नवोदय विद्यालये आहेत.भारत सरकारच्या संपूर्ण आर्थिक सहाय्याने "नवोदय विद्यालय समिती" या स्वायत्त यंत्रणेमार्फत मुलां-मुलींसाठी निवासी जवाहर नवोदय विद्यालये सुरु करण्यात आलेली आहेत.जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीत **'जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी'** परीक्षेद्वारे प्रवेश देण्यात येतो. शिक्षणाचे माध्यम इयत्ता आठवी पर्यंत मातृभाषा किंवा क्षेत्रिय भाषा असून त्यानंतर गणित व विज्ञान इंग्रजी भाषेतून आणि समाजशास्त्र हिंदी भाषेतून शिकविण्यात येतात. जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थी केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या बोर्ड (इयत्ता 10वी व 12वी) परीक्षांना बसतात. या विद्यालयातील विद्यार्थ्यांना भोजन,गणवेश, निवास आणि वह्या-पुस्तके आदींची मोफत व्यवस्था केली जाते. तथापि 9 वी ते 12 वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा 600 रु. नाममात्र शुल्क (फी) विद्यालय विकास निधी म्हणून घेतली जाते. जे विद्यार्थी अनु.जाती, अनु. जमाती, सर्व मुली, दिव्यांग आणि ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न गरिबी रेषेच्या खाली आहे या सर्वांना यातून सूट आहे. **सूट दिलेले** ( वर्ग 6 ते 8 चे सर्व विद्यार्थी, जे विद्यार्थी अनुसूचित जाती ,अनुसूचित जमाती, सर्व मुली,दिव्यांग आणि ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न गरिबी रेषेच्या खाली आहे) **विद्यार्थी सोडून इतर विद्यार्थी** ,ज्यांचे पालक **सरकारी कर्मचारी** आहेत त्या विद्यार्थ्यासाठी रु. 1500 प्रती माह प्रती विद्यार्थी किंवा अश्या पालकांना त्यांच्या कार्यालयाकडून मिळालेला शैक्षणिक भत्ता या पैकी जी रक्कम कमी असेल ती फी विद्यालय विकास निधी म्हणून जमा करावी लागेल. असे असले तरीही विद्यालय विकास निधी म्हणून जमा करण्यात येणारी फी रु. 600 प्रती माह प्रती विद्यार्थी पेक्षा कमी नसावी.

### योजनेची वैशिष्ट्ये

i. प्रामुख्याने ग्रामीण भागातील प्रतिभावान मुलांना सांस्कृतिक संवर्धन, मूल्य संवर्धन, संस्कारांचे मूल्यमापन, पर्यावरणाविषयी जागरूकता, साहसी क्रियाकलाप आणि शारीरिक शिक्षण यासह दर्जेदार आधुनिक शिक्षण प्रदान करणे.

ii. विद्यार्थ्यांमध्ये त्रिभाषा सूत्राप्रमाणे तीन भाषांचे किमान पातळीवर ज्ञान वृद्धिंगत करणे.

iii. हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना अहिंदी भाषिक प्रदेशामध्ये व अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना हिंदी भाषिक प्रदेशामध्ये स्थलांतरित करून राष्ट्रीय एकात्मता साधणे.

iv. उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा व शैक्षणिक अनुभव याद्वारे जिल्ह्याच्या शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी केंद्रबिंदू म्हणून कार्य करणे.

## 1.1 राज्य निहाय जवाहर नवोदय विद्यालयांचे विभाजन

प्रत्येक जिल्ह्यामध्ये टप्या टप्याने एक जवाहर नवोदय विद्यालय उघडण्याचे निश्चित करण्यात आले असून सध्या 27 राज्ये व 8 केंद्रशासित प्रदेशमध्ये 661 विद्यालये मंजूर करण्यात आली आहेत. राज्यनिहाय मंजूर करण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालयांची संख्या खालील प्रमाणे आहे:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | 13+02** | UT लद्दाख | 02 | पंजाब | 22+01** |
| आसाम | 27+01** | UT जम्मू व काश्मीर | 20+01** | UT पुद्दुचेरी | 04 |
| अरुणाचल प्रदेश | 18 | झारखंड | 24+02** | राजस्थान | 33+02** |
| UT अंदमान व निकोबार बेट | 03 | कर्नाटक | 30+01** | सिक्कीम | 04 |
| बिहार | 38+01** | केरळ | 14 | त्रिपुरा | 08 |
| UT चंडीगड | 01 | UT लक्षद्वीप | 01 | तेलंगाना | 09 |
| छत्तीसगड | 27+01** | मध्य प्रदेश | 51+02**+ 01* | उत्तर प्रदेश | 75+01** |
| UT दिल्ली | 09 | महाराष्ट्र | 33+01** | उत्तराखंड | 13 |
| UT दादरा-नगर हवेली आणि दमन-दीव | 03 | मणिपूर | 09+02* | पश्चिम बंगाल | 19+01** |
| गोवा | 02 | मेघालय | 11+01** | एकूण 638+20**+3*= 661 | |
| गुजरात | 33+01** | मिझोरम | 08 | | |
| हरियाणा | 21 | नागालँड | 11 | | |
| हिमाचल प्रदेश | 12 | ओरिसा | 30+01** | | |

** अनु.जाति/अनु.जमाती संवर्गातील जास्त लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यामध्ये एक अतिरिक्त जनवि मंजूर करण्यात आलेले आहे.* विशेष जनवि

योग्य उमेदवार उपलब्ध असल्यास प्रत्येक विद्यालयामध्ये इयत्ता सहावीत प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून जास्तीत जास्त 80 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. जर पुरेशी निवासीजागा उपलब्ध झाली नाही तर विद्यार्थी प्रवेश संख्या 80 वरून 40 पर्यंत खाली आणणे, विद्यालय प्रवेश परीक्षा स्थगित करणे किंवा प्रवेश परीक्षेचा निकाल स्थगित करणे(राखून ठेवणे) या बाबतचा हक्क नवोदय विद्यालय समिती राखून ठेवत आहे.

## 1.2 जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी- 2022

जनवि मध्ये शैक्षणिक वर्ष 2022-23 च्या वर्ग 6 वी तील प्रवेशाकरिता **जवाहर नवोदय विद्यालय, निवड चाचणी- 2022** ही **शनिवार दि. 30 एप्रिल 2022 रोजी सकाळी 11:30 वाजता** सर्व जवाहर नवोदय विद्यालयांसाठी एकाच वेळी घेण्यात येईल.

**ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तिथी 30 नोव्हेंबर 2021 ही आहे.**

**जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी 2022 साठी ऑनलाईन अर्ज कसा करावा?**

### 2.1 जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी 2022 साठी ऑनलाईन अर्ज नोंदणी प्रक्रिया :-

(i) जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी अर्ज करण्याची प्रक्रिया ऑनलाईन द्वारे सोपी केली आहे. **ऑनलाईन अर्ज नोंदणी नवोदय विद्यालय समिती** च्या **एडमिशन पोर्टल** द्वारे www.navodaya.gov.in **आणि** navodaya.gov.in/nvs/en/Admission-JNVST/JNVST-class/ या संकेत स्थळावर **विनामूल्य** करता येईल. **उमेदवाराचे निवास (ग्रामीण/शहरी), वय, शैक्षणिक पात्रता, इ. साठी पुराव्याची विस्तृत आणि सविस्तर तपासणी फक्त निवड झालेल्या उमेदवारांचीच केली जाईल.**

(ii) पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करतांना, योग्यरित्या भरलेले प्रमाणपत्र ज्यावर स्वत:चे अलीकडील काळात काढलेले छायाचित्र आणि स्वत:ची तसेच पालकाची स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र ( jpeg स्वरूपात, 10kb-100kb प्रमाणात) ऑनलाईन अपलोड करावयाचे आहे.

(iii) राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था (N.I.O.S.) च्या पात्र उमेदवारांनी **'बी'** प्रमाणपत्र मिळविणे आवश्यक आहे आणि त्यांच्या राहण्याचा तोच जिल्हा असावा ज्या जिल्ह्यातील नवोदय विद्यालयात तो/ती प्रवेश घेऊ इच्छित आहे.

(iv) अर्ज करण्याची ऑनलाईन प्रक्रिया खुली, सोपी, मुक्तस्रोत आणि विनामूल्य आहे. डेस्कटॉप, लॅपटॉप, मोबाइल, टॅब्लेट इत्यादी कोणत्याही स्रोतांकडून अर्ज सबमिट केला जाऊ शकतो.

(v) सर्व ज.न.वि. मध्ये अर्ज करण्याची ऑनलाईन प्रक्रिया खुली, सोपी व विनामूल्य करण्यासाठी मार्गदर्शन मंच सुरु करण्यात आलेले आहेत. इच्छुक पालकांनी आपल्या पाल्याच्या सोबत अर्ज

करतांना लागणारी आवश्यक ती कागदपत्रे फोटो, प्रमाणपत्र, मोबाइल फ़ोन, चालू मोबाइल क्रमांक (नोंदणी क्रमांक व पासवर्ड मिळविण्याकारिता) घेऊन संपर्क करावा.

### 2.2 प्रवेशपत्रे वितरण

प्रवेशपत्रे नवोदय विद्यालय समितीने निश्चित केलेल्या तारखेनुसार उपलब्ध करुन दिली जातील जी **एडमिशन पोर्टल वरून** उपलब्ध होतील. प्रवेशपत्रे **जवाहर नवोदय विद्यालय, निवड चाचणी** पूर्वी उमेदवार / पालकांनी विनामूल्य डाउनलोड केली पाहिजेत.

### 2.3 निवड चाचणीचा निकाल

जे एन व्ही निवड चाचणी **2022** चा निकाल जून **2022** पर्यंत जाहीर होणे अपेक्षित आहे. उमेदवार प्रवेश पोर्टल वरून निकाल घेऊ शकतात. त्याच प्रमाणे निवड चाचणीचा निकाल संबंधित ज.न.वि. साठी खालील कार्यालया मध्ये प्रदर्शित केला जाईल .

1. जवाहर नवोदय विद्यालय
2. जिल्हा शिक्षण अधिकारी कार्यालय
3. जिल्हा दंडाधिकारी कार्यालय
4. उपायुक्त नवोदय विद्यालय समिती संभागीय कार्यालय
5. नवोदय विद्यालय समिती च्या www.navodaya.gov.in संकेत स्थळ

प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय यांच्याकडून संबंधित उमेदवारांना शीघ्र डाकेद्वारे (स्पीड पोस्ट) व नोंदणीकृत फोन वर SMS द्वारा कळवले जाईल .

## निवड आणि प्रवेश

3.1) परीक्षेतील निवडी मुळे ज.न.वि. मध्ये प्रवेश मिळविण्याचा उमेदवाराचा कोणताही हक्क होत नाही. वास्तविक प्रवेश घेण्याच्या वेळी, प्रत्येक निवड झालेल्या उमेदवारास सर्व संबंधित प्रमाणपत्रे सादर करावी लागतील, जी नवोदय विद्यालय समितीने ठरवून दिली आहेत. प्रवेश निश्चित होईपर्यंत निवड केवळ तात्पुरती आहे. उमेदवारास असा सल्ला देण्यात येत आहे की, संबधित ज. न.वि. द्वारे कागदपत्रांची पडताळणी आणि प्रवेश निश्चित झाल्यावरच आपल्या शाळेतून टी सी करिता अर्ज करावा.

3.2) कुठल्याही तक्रारीच्या संदर्भात नवोदय विद्यालय समितीचा निर्णय हा अंतिम राहील व तो उमेदवारास बंधनकारक राहील.

3.3) निवड झालेल्या व निवड न झालेल्या उमेदवारांचे गुण कळविले जाणार नाहीत.

3.4) उत्तरपत्रिकेची फेरतपासणी करण्याची तरतूद नाही. संगणकावर निकाल तयार होत असल्यामुळे पुन्हा गुणांची बेरीज तपासली जात नाही. कारण निकाल तयार करताना प्रत्येक पायरीची काटेकोरपणे तपासणी करण्याची काळजी घेण्यात येत असते.

3.5) उमेदवार आणि त्यांचे पालक यांनी हे देखील लक्षात घेतले पाहिजे की एन व्ही एस योजने अंतर्गत इयत्ता नववी मध्ये विद्यार्थी असतांना एका शैक्षणिक वर्षासाठी हिंदी भाषिक राज्यामध्ये असलेल्या जे एन व्ही च्या विद्यार्थ्यांना गैर हिंदी भाषिक राज्यात दुसऱ्या जे एन व्ही मध्ये स्थलांतर करावे लागेल आणि त्या उलट गैर हिंदी भाषिक राज्यामध्ये असलेल्या जे एन व्ही च्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषिक राज्यात दुसऱ्या जे एन व्ही मध्ये स्थलांतर करावे लागेल. स्थलांतर करण्यासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांनी / पालकांनी नकार दिल्यास, जे एन व्ही मध्ये अशा विद्यार्थ्यांना पुढे शिक्षण सुरू ठेवण्यास परवानगी दिली जाणार नाही.

3.6) विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की निवड झालेल्या विद्यार्थ्याला ज्या जिल्ह्यातून तो परीक्षेला बसला असेल त्या जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालय येथे त्याला प्रवेश दिला जाईल. कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या विद्यार्थ्याला दुसऱ्या जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही. शिक्षणाच्या माध्यमाच्या कारणास्तव अथवा पालकांची बदली अन्य जिल्ह्यात किंवा राज्यात झाली या कारणास्तव विद्यार्थ्यांची बदली दुसऱ्या जवाहर नवोदय विद्यालयात करण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

3.7) निवड झालेल्या अनु.जाति(SC), अनु.जमाती(ST) व इतर मागासवर्गीय(OBC) संवर्गातील उमेदवारांना प्रत्यक्ष प्रवेश घेते वेळी जात प्रमाण पत्र सादर करावे लागेल. निवड झालेल्या इतर मागासवर्गीय(OBC) संवर्गातील उमेदवारांना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग मार्फत विहित नमुन्यात असलेले ओबीसी प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (नमुना संलग्न). अशी प्रमाणपत्रे ज्या वर्षात प्रवेश घ्यावयाचा आहे त्याच्या 30 मार्च पर्यंत सक्षम अधिकाऱ्याकडून मिळवलेली असली पाहिजेत म्हणजेच ती त्यांना प्रवेश घेतेवेळी जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांना सादर करणे शक्य होईल. उदाहरणार्थ शैक्षणिक सत्र 2022-23 करिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता संबंधित प्रमाणपत्रे 30 मार्च 2022 पर्यंत मिळवलेली असली पाहिजेत.

3.8) जे उमेदवार ग्रामीण जागेमधून प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी तिसरी,चौथी व पाचवी इयत्ता शासकीय/शासनमान्य/शासन संलग्न –प्रमाणित ग्रामीण शाळेमधून पूर्ण शैक्षणिक वर्षभर शिक्षण घेतले आहे असे प्रमाणपत्र संबंधित सक्षम अधिकाऱ्याकडून घेऊन प्रवेश घेतेवेळी सादर करावे.

3.9) अपंग संवर्गातील (अस्थिव्यंग अपंगत्व, कर्णबधीर/बहिरेपणा,दृष्टीचे अपंगत्व) उमेदवारांनी निवड झाल्यास प्रवेश घेतेवेळी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र नियमित प्रारुपात सादर करावे.

3.10) तृतीयपंथी उमेदवारांना निवड झाल्यास संबंधित राज्याच्या सक्षम अधिकाऱ्याचे तृतीयपंथी असल्याचे प्रमाण पत्र सादर करावे लागेल. या संवर्गातील उमेदवारासाठी राखीव जागेची तरतूद केलेली नाही.

## उमेदवारासाठी पात्रता (कोण पात्र आहे)

### सर्व उमेदवारांसाठी:

4.1 ज्या जिल्ह्यामध्ये जवाहर नवोदय विद्यालय आहे त्याच जिल्ह्यातील उमेदवार प्रवेश परीक्षेला पात्र समजण्यात येतील. तथापि ज्या जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालय सुरु झाले व त्या जिल्ह्याची नंतर विभागणी झाली असेल व नवीन जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालय सुरु झाले नसेल तर विद्यालय प्रवेश पात्रतेचा विचार करतांना जुन्या जिल्ह्याची सीमा विचारात घेतली जाईल.

4.2 प्रवेश परीक्षा देणाऱ्या उमेदवाराचा जन्म **01-05-2009** पूर्वी व **30-04-2013** (दोन्ही दिवस धरून) नंतर झालेला नसावा. ही अट अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीं, इतर मागासवर्गीय(OBC) च्या उमेदवारांसह सर्व उमेदवारांना लागू राहील. प्रवेश घेणाऱ्या उमेदवाराच्या वयाबाबत शंका असल्यास सदरची बाब वैद्यकीय मंडळाकडे वयाचे निश्चितीकरण करण्यास्तव मांडली जाईल. वैद्यकीय मंडळाने दिलेला निर्णय अंतिम राहील.

4.3 निवड चाचणीसाठी बसणारा उमेदवार हा तो ज्या जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश घेऊ इच्छित असेल, त्याच जिल्ह्यातील सरकारी / निमसरकारी अनुदानित / मान्यताप्राप्त शाळेत किंवा राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्थेच्या “ब” वर्गातील शाळेत इयत्ता पाचवीमध्ये संपूर्ण शैक्षणिक सत्र **2021-22** मध्ये शिकत असला पाहिजे. **जे विद्यार्थी यापूर्वीच्या शैक्षणिक सत्रात इयत्ता पाचवी शिकत होते किंवा इयत्ता पाचवी उत्तीर्ण झाले असतील तर ते या प्रवेश निवड चाचणी करिता पात्र राहणार नाहीत.** एखाद्या शाळेस शासन किंवा शासकीय प्राधिकरण यांची मान्यता असेल तर ती शाळा मान्यताप्राप्त समजली जाईल. तसेच शासन/शासकीय प्राधिकरणाद्वारा प्रायोजित शाळा तसेच राष्ट्रीय मुक्त विद्यालये संस्थेने दर्जा दिलेल्या मुक्त शाळा याही मान्यता प्राप्त समजण्यात येतील. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी विद्यार्थी हा अशा शाळांमधून इयत्ता

पाचवी **2021-22** या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झाला पाहिजे. तरच इतर अटींच्या अधीन राहून **2022-23** मध्ये त्याला इयत्ता सहावी करिता प्रवेश दिला जाईल.

4.4 जे उमेदवार ग्रामीण जागेमधून प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी तिसरी,चौथी व पाचवी इयत्ता शासकीय/शासनमान्य /शासन संलग्न –प्रमाणित ग्रामीण शाळेमधून पूर्ण शैक्षणिक वर्षभर शिक्षण घेऊन सलग उत्तीर्णझाले असले पाहिजे.

4.5 जे विद्यार्थी 'राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्थान ' चे 'बी ' सर्टिफिकेट घेऊन इयत्ता पाचवी 30 सप्टेंबर 2021 पूर्वी उतीर्ण होतील त्यांनाही परीक्षेला बसता येईल. त्यांना वयाची अट इतर विद्यार्थ्यांप्रमाणे राहील. असे विद्यार्थी मागील तीन वर्षे ग्रामीण भागात राहत असतील, तर त्यांचा ग्रामीण स्तर मा. तहसीलदार किंवा मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्रावर अवलंबून राहील. जे विद्यार्थी वरील योजनेंतर्गत शहरी किंवा निश्चित केलेल्या भागात येत असतील ते ग्रामीण आरक्षणास पात्र राहणार नाहीत.

4.6A उमेदवाराने जर **15 सप्टेंबर 2021** पूर्वी पाचवीत प्रवेश घेतला नसेल, तर तो प्रवेश अर्ज करण्यास अपात्र राहील.

4.7 **उमेदवाराला कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्यांदा प्रवेश चाचणीस बसता येणार नाही.**

**ग्रामीण उमेदवारांसाठी:**

अ) प्रत्येक जिल्ह्यातील किमान 75 टक्के जागा ग्रामीण उमेदवारांना देण्यात येतील आणि उरलेल्या जागा त्याच जिल्ह्यातील शहरी विभागातून भरण्यात येतील.

ब) ग्रामीण जागेसाठी इच्छुक उमेदवाराने ग्रामीण विभागातून तिसरी,चौथी आणि पाचवी इयत्ता (सलगपणे) प्रत्येक वर्षी पूर्ण शैक्षणिक वर्ष भरून शासनमान्य शाळेतून अभ्यास केला असल्यास ग्रामीण जागांसाठी त्याच्या अर्जाचा विचार केला जाईल. **तथापि असा उमेदवार इयत्ता पाचवी त्याच जिल्ह्याच्या शाळेत शिकत असला पाहिजे ज्या जिल्ह्याच्या जवाहर नवोदय विद्यालयात त्याला प्रवेश घेण्याची इच्छा आहे.**

क) ज्या उमेदवारांनी राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था यामधून शिक्षण घेतले असेल त्यांनी मा. जिल्हाधिकारी/ मा. तहसीलदारकिंवामा. गटविकास अधिकारी यांचे ग्रामीण भागात राहत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

### शहरी उमेदवारासाठी:

उमेदवाराने तिसरी, चौथी आणि पाचवी यातील शैक्षणिक वर्षातील एक दिवस जरी शहरी भागात असलेल्या शाळेतून अध्ययन केले असेल तर त्याला शहरी विभागातील समजण्यात येईल. 2011 च्या जनगणनेनुसार किंवा शासकीय परिपत्रकानुसार शहरी म्हणून जाहीर झालेल्यास शहरी मानले जाईल. इतर सर्व विभाग ग्रामीण समजले जातील.

### तृतीयपंथी उमेदवारासाठी

तृतीयपंथी उमेदवारांसाठी वेगळ्या राखीव जागा नसून त्यांना मुलांच्या गटातून अर्ज करता येईल. ग्रामीण,शहरी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग संवर्गातील राखीव जागा मुलांप्रमाणे ग्राह्य धरण्यात येतील.

## जागांचे आरक्षण

अ) प्रत्येक जिल्ह्यातील किमान 75 टक्के जागा ग्रामीण उमेदवारांना देण्यात येतील आणि उरलेल्या जागा त्याच जिल्ह्यातील शहरी विभागातून भरण्यात येतील.

ब) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी असणाऱ्या राखीव जागेचे प्रमाण हे पूर्ण जिल्ह्यातील लोकसंखेच्या प्रमाणात आहे परंतु कोणत्याही जिल्ह्यात हे प्रमाण राष्ट्रीय प्रमाण सरासरीपेक्षा (अनुसूचित जाती 15 % व अनुसूचित जमाती 7.5%) कमी असणार नाही. परंतु जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी (दोन्ही वर्गाचे एकत्रित ) कमाल राखीव जागा 50% राहतील. विशेष परिस्थिती अंतर्गत या दोन्ही मधील राखीव जागांच्या प्रमाणात अंतर्गत बदल केला जाऊ शकतो,याहून अधिक उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गात केली जाईल.

क) इतर मागासवर्गीय (OBC) विद्यार्थ्यांना अनु.जाती आणि अनु.जमाती च्या आरक्षणाच्या वरील आणि त्याहून अधिक 27% आरक्षण दिले जाईल. ओबीसी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी आरक्षण वेळोवेळी केंद्रीय यादीनुसार लागू केली जाईल. केंद्रीय यादीमध्ये समाविष्ट न केलेले ओबीसी उमेदवार सामान्य उमेदवार म्हणून अर्ज करतील.

ड) एकूण जागांपैकी 1/3 जागा मुलींसाठी राखीव आहेत.

ई) **दिव्यांग** ** उमेदवारांसाठी शासकीय नियमानुसार राखीव जागांची तरतूद आहे. (ज्या अंतर्गत अस्थिव्यंग अपंगत्व, कर्णबधीर/बहिरेपणा, दृष्टीचे अपंगत्व यांचा समावेश आहे.)

** **दृष्टीचे अपंगत्व**म्हणजे खालील दिलेल्या स्थितीप्रमाणे जर ;

अ) संपूर्ण दृष्टिहीन किंवा,

आ) दृष्टीदोष घालविण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या चष्म्याचा नंबर चांगल्या डोळयामध्ये 6/60

किंवा 20/200 (Snellen) या पेक्षा जास्त नसावा किंवा,

इ) दृष्टीची मर्यादा 20 डिग्री कोन किंवा त्यापेक्षा अधिक नसावी.

** **कर्णबधीर/बहिरेपणा** म्हणजे 60 डेसीबलची ध्वनी किंवा संभाषण ऐकण्याची क्षमता या पेक्षा जास्त असावी.

** **स्थलांतराचे पंगुत्व** म्हणजे अस्थिसांध्याचे पंगुत्व किंवा शरीरातील अवयवांचे सुरळीतपणे हालचाल करण्यास अडचणी निर्माण होणे किंवा सेरेब्रल पाल्सी(मेंदूचा अर्धांग वायू).

** **व्यक्तीला असलेले अपंगत्व म्हणजे संबंधित व्यक्तीला 40 टक्के पेक्षा कमी अपंगत्व नाही. असे कायदेशीर प्रमाणपत्र वैद्यकीय अधिकाऱ्याने दिले असले पाहिजे.**

## निवड झाल्यास सादर करावयाची प्रमाणपत्रे

**उमेदवाराची प्रवेश चाचणीद्वारे तात्पुरती निवड झाल्यास प्रत्यक्ष प्रवेश घेते वेळी पालकांना खालील प्रमाणपत्र/कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल.**

i. जन्मतारखेचा पुरावा.

ii. नवोदय विद्यालय समितीच्या नियमानुसार योग्यता प्रमाणपत्रे

iii. ग्रामीण विभागातून प्रवेश घेणाऱ्या उमेदवाराच्या पालकांनी त्यांचा पाल्य ग्रामीण भागातून शिकला असल्याचे सक्षम प्राधिकरण अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

iv. केवळ राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था यामधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांसाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या प्रारूपानुसार रहिवाशी प्रमाणपत्र

v. इतर संबंधित कागदपत्रे .

## निवड चाचणीबाबत

### 1. परीक्षा केंद्र

उमेदवाराच्या प्रवेशपत्रावर जे परीक्षा केंद्र नोंदविलेले आहे त्याच परीक्षा केंद्रावर त्याला परीक्षा द्यावी लागेल. नोंदविल्या गेलेल्या केंद्राव्यतिरिक्त इतर केंद्रावर त्याला परीक्षा देता येणार नाही. कोणत्याही कारणास्तव एकदा दिलेले परीक्षा केंद्र बदलण्याची विनंती मान्य होणार नाही. कोणत्याही उमेदवाराला योग्य प्रवेशपत्राशिवाय चाचणी परीक्षेला बसता येणार नाही. प्रवेश पत्र नवोदय विद्यालय समिती मुख्यालयाच्या www.navodaya.gov.inया संकेतस्थळावरून प्रवेश पोर्टल च्या माध्यमातून डाऊनलोड करता येईल.

## 2. परीक्षेचे भाषा माध्यम

**जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी पुढे नमूद केल्या प्रमाणे राज्यनिहाय विविध भाषेतून घेतली जाते.:**

| केंद्रशासित प्रदेश/ राज्याचे नाव | भाषा |
|---|---|
| अंदमान आणि निकोबार बेटे | हिंदी,इंग्रजी,तमिळ,उर्दू,बंगाली |
| आंध्रप्रदेश | हिंदी,इंग्रजी,तेलगु,मराठी,उर्दू,ओरिया,कन्नड |
| अरुणाचल प्रदेश | हिंदी,इंग्रजी |
| आसाम | इंग्लिश,हिंदी,आसामी,बोडो,गारो,बंगाली,मणिपुरी(बांगलास्क्रिप्ट),मणिपुरी(मैतेई मयेक) |
| बिहार | इंग्लिश,हिंदी, उर्दू. |
| चंडीगड | इंग्लिश,हिंदी,पंजाबी |
| छत्तीसगड | इंग्लिश,हिंदी |
| दिल्ली | इंग्लिश,हिंदी |
| गोवा | इंग्लिश,हिंदी,मराठी,कन्नड |
| गुजरात | इंग्लिश,हिंदी,मराठी,गुजराथी |
| हरियाणा | इंग्लिश,हिंदी. |
| हिमाचल प्रदेश | इंग्लिश,हिंदी |
| जम्मू आणि काश्मीर | इंग्लिश,हिंदी,उर्दू. |
| झारखंड | इंग्लिश,हिंदी,उर्दू,ओरिया |
| कर्नाटक | इंग्लिश,हिंदी,कन्नड,तेलगु,मराठी,उर्दू, मल्याळम,तमिळ |
| केरळ | इंग्लिश,हिंदी,कन्नड,मल्याळम,तमिळ |
| लक्षद्वीप | इंग्लिश,हिंदी,मल्याळम |
| मध्यप्रदेश | इंग्लिश,हिंदी,उर्दू,मराठी,गुजराथी |
| महाराष्ट्र | इंग्लिश,हिंदी,कन्नड,मराठी,उर्दू,तेलगु,गुजराथी. |
| मणिपूर | इंग्लिश,हिंदी,मणिपुरी(मैतेई मयेक) |
| मेघालय | इंग्लिश,हिंदी,खासी,गारो,बंगाली,असामी |
| मिझोरम | इंलीश,हिंदी,मिझो. |
| नागालँड | इंग्लिश,हिंदी |
| ओरिसा | इंग्लिश,हिंदी,तेलगु,ओरिया,उर्दू |
| पुद्दुचेरी | इंग्लिश,तमिळ,तेलगु,मल्याळम,हिंदी. |
| पंजाब | इंग्लिश,हिंदी,पंजाबी |
| राजस्थान | इंग्लिश,हिंदी |
| सिक्कीम | इंग्लिश,हिंदी,नेपाळी |
| तेलंगाना | इंग्लिश,हिंदी,कन्नड,तेलगु,मराठी,उर्दू |
| त्रिपुरा | इंग्लिश,हिंदी,बंगाली |
| केंद्रशासितप्रदेश लद्दाख | इंग्लिश,हिंदी,उर्दू |
| केंद्रशासितप्रदेश दादरा नगर हवेली, आणि दमन-दीव | इंग्लिश,हिंदी,गुजराथी,मराठी. |
| उत्तर प्रदेश | इंग्लिश,हिंदी,उर्दू |
| उत्तराखंड | इंग्लिश,हिंदी,उर्दू |
| पश्चिमबंगाल | इंग्लिश,हिंदी,बंगाली,नेपाळी,उर्दू |

**नोंद:- उमेदवाराला त्याने त्याच्या प्रवेश अर्जात नमूद केलेल्या भाषामाध्यमाचीच चाचणी पुस्तिका पुरविण्यात येईल.**

## 3. निवड चाचणीचे प्रारूप

निवड चाचणी ही सलग दोन तासाची असेल व ती स.11:30 ते दु.01:30 या वेळेत घेण्यात येईल. यात तीन विभाग असून सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी असतील. तीनही विभाग मिळून 100 गुणांचे 80 प्रश्न असतील.

| चाचणी चा प्रकार | प्रश्नसंख्या | गुण | कालावधी |
|---|---|---|---|
| बुद्धिमत्ताचाचणी | 40 | 50 | 60 मिनिटे |
| गणितीय चाचणी | 20 | 25 | 30 मिनिटे |
| भाषा चाचणी | 20 | 25 | 30 मिनिटे |
| **एकूण** | **80** | **100** | **02 तास** |

तीनही विभाग एकाच पुस्तिकेमध्ये समाविष्ट असलेली एक चाचणी पुस्तिका प्रत्येक उमेदवाराला पुरविण्यात येईल. "**दिव्यांग** "(विशेष विद्यार्थी) उमेदवारांना अतिरिक्त 40 मिनिटे कालावधी चा वेळ देण्यात येईल.

## 3. उत्तरे नोंदविण्याची पद्धत

a) उत्तरासाठी स्वतंत्र उत्तर पत्रिका (OMR) देण्यात येईल. उमेदवाराने स्वत: उत्तराच्या नोंदी उत्तरपत्रिकेत नेमून दिलेल्या जागेत करावयाच्या आहेत. उत्तरपत्रिकेचा(OMR) नमुना नवोदय विद्यालय समिती च्या संकेत स्थळावरून बघता येईल.

b) उमेदवाराने उत्तरे लिहिण्याकरिता काळा/निळा बॉलपेनच वापरावा. उमेदवाराने स्वत:चे बॉलपेन आणावयाचे आहे. शिसपेन्सिलचा वापर चाचणी परीक्षेत करता येणार नाही.

c) प्रत्येक प्रश्नांसाठी चार संभाव्य उत्तरे सुचविलेली असतील त्यातील एकच उत्तर अचूक असेल. उमेदवाराने अचूक उत्तराचा क्रमांक चे वर्तुळ पेनानेखाली दर्शविल्याप्रमाणे पूर्ण छायांकित करावे. उदाहरणार्थ जर तुमच्या प्रश्न क्र. 37 चे उत्तर **क** असेल तर ते उत्तरपत्रिकेत असे छायांकित करावे.

37. (अ) (ब) (**क** – छायांकित) (ड)

d) उत्तरपत्रिकेतील(OMR) एकदा लिहिलेले उत्तर बदलता येणार नाही. लिहिलेले उत्तर गिरविले,दुरुस्त केले किंवा खाडाखोड केली तर ते उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.

e) प्रत्येक अचूक उत्तराला 1.25 गुण देण्यात येईल.

f) चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा केले जाणार नाहीत.

## 4. सूचना आणि उदाहरणे

A. उमेदवाराने चाचणी पुस्तिकेच्या मुखपृष्ठावर तसेच प्रत्येक विभागाच्या सुरुवातीला दिलेल्या सूचना, प्रश्न सोडविण्यापूर्वी काळजीपूर्वक वाचाव्यात. परीक्षेसाठी उमेदवाराने चाचणी पुस्तिका त्याने निवडलेल्या भाषेतील आहे याची खात्री करून घ्यावी जर त्याला/तिला दुसऱ्या भाषेतील चाचणी पुस्तिका दिली गेली असल्यास त्याने/तिने उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी (परीक्षेच्या सुरुवातीलाच) बदलून घ्यावी. प्रवेश अर्जामध्ये नमूद केलेल्या भाषेमधील चाचणी पुस्तिका घेण्याची जबाबदारी उमेदवारावर राहील. या संदर्भात परीक्षा संपल्यानंतर कोणतीही तक्रार/पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही.

B. एकूण वेळ सलग दोन तास राहील. दिव्यांग उमेदवारांना अतिरिक्त 40 मिनिटे कालावधी चा वेळ देण्यात येईल.

C. प्रवेशास पात्र होण्यासाठी चाचणीच्या तीनही विभागात स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सुचविलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ उमेदवाराने एकाच विभागावर खर्च करू नये. अर्थात वेळेची विभागणी स्वत:च्या मर्जीनुसार करण्याची मुभा उमेदवाराला आहे.

D. दर तीस मिनिटाला घंटा होईल.

i. योग्य प्रवेशपत्र दाखविल्या शिवाय कोणत्याही उमेदवाराला परीक्षा दालनात प्रवेश मिळणार नाही.

ii. उमेदवाराने बरोबर 11:00 किंवा तत्पूर्वी आपल्या जागेवर स्थानापन्न व्हावे. चाचणी परीक्षा सुरु झाल्यानंतर उमेदवाराला परीक्षा दालनात प्रवेश मिळणार नाही.

iii. चाचणी परीक्षेची पूर्ण वेळ संपण्यापूर्वी कोणत्याही उमेदवाराला परीक्षा दालन सोडता येणार नाही.

## प्रश्नपत्रिकेचे स्वरूप


### विभाग-1बौद्धिक क्षमता चाचणी (MAT)

ही एक अशाब्दिक चाचणी आहे. प्रश्न आकृत्या व रेखाटने यावर आधारित आहेत.हे प्रश्न विद्यार्थ्यांचे सर्वसाधारण बौद्धिक कार्याचे आकलन करणारे आहेत. हा विभाग दहा प्रकारात विभागाला आहे. प्रत्येक प्रकारात 4 प्रश्न आहेत. खाली काही उदाहरने दिली आहेत.

## भाग-I (गटात न बसणारे)

### निर्देश:

प्रश्न 1 ते 4मध्ये प्रत्येकी चार आकृत्या अ,ब,क,ड दिलेल्या आहेत. त्यातील तीन आकृत्या काही प्रमाणात साम्य दर्शक आहेत व एक आकृती वेगळी आहे. वेगळी असणारी आकृती शोधा.





**बरोबर उत्तर (अ) आहे.**

## भाग-II (आकृतीतील साम्यता)

### निर्देश:

प्रश्न क्रमांक 5 ते 8 मध्ये डाव्या बाजूला प्रश्न आकृती दिलेली आहे. आणि उजव्या बाजूला उत्तराच्या अ,ब,क,ड आकृत्या दिलेल्या आहेत. त्यातील प्रश्न आकृतीला साम्य असणारी आकृती शोधा.






**बरोबर उत्तर (क) आहे.**

## भाग-III (आकृती पूर्ण करणे)

### निर्देश:

प्रश्न क्रमांक 9 ते 12 मध्ये डाव्या बाजूला प्रश्न आकृती दिलेली आहे. त्यातील एक भाग अपूर्ण आहे. उजव्या बाजूला उत्तराच्या अ,ब,क,ड आकृत्या दिलेल्या आहेत. त्यातील एक आकृती अशी निवडा की तिची दिशा न बदलता जशीच्या तशी प्रश्न आकृतीत बसविली तर प्रश्न आकृती पूर्ण होईल.








बरोबर उत्तर (अ) आहे.

## भाग-IV (आकृतीक्रम पूर्ण करणे)

### निर्देश:

प्रश्न क्रमांक 13 ते 16 मध्ये डाव्या बाजूला तीन प्रश्न आकृत्या दिलेल्या आहेत. चौथ्या आकृतीसाठी जागा रिकामी ठेवली आहे. प्रश्न आकृत्यांमध्ये एक क्रम किंवा संगती आहे. उत्तर आकृत्यामधील एक आकृती अशी निवडा की ती प्रश्न आकृत्यांपैकी रिकाम्या जागेत बसविल्यास प्रश्न आकृत्यांचा क्रम किंवा संगती कायम राहील.







बरोबर उत्तर (क) आहे.

## भाग-V (भिन्न आकृतीतील समानता )

### निर्देश:

प्रश्न क्रमांक 17 ते 20 मध्ये प्रत्येकी दोन प्रश्न आकृत्यांचे दोन संच आहेत. दुसऱ्या संचात प्रश्नचिन्ह आहे. पहिल्या संचातील पहिल्या व दुसऱ्या आकृतीत काही संबंध आहे. तसाच संबंध दुसऱ्या संचातील आकृतीत असायला हवा. तसा संबंध येण्यासाठी प्रश्न चिन्हाच्या जागी योग्य ती आकृती उत्तर आकृत्यांमधून शोधा.





**बरोबर उत्तर (अ) आहे.**

## भाग-VI (भौमितिक आकृत्यातील पूर्णता-त्रिकोण,चौरस,वर्तुळ )

### निर्देश:

प्रश्न क्रमांक 21 ते 24 मध्ये डाव्या बाजूला भौमितिक आकृतिचा एक भाग प्रश्न आकृती म्हणून दिलेला आहे. आणि उरलेला भाग उजवीकडील उत्तर आकृती अ,ब,क,ड मध्ये दिलेला आहे. प्रश्न आकृती पूर्ण होण्याकरिता योग्य ती आकृती उत्तर आकृत्यांमधून शोधा.






**बरोबर उत्तर (अ) आहे.**

## भाग-VII (प्रतिबिंबित आकृती )

### निर्देश:

प्रश्न क्रमांक 25 ते 28मध्ये डाव्या बाजूला एक प्रश्न आकृती दिलेली आहे. उजवीकडे अ,ब,क,ड उत्तर आकृत्या दिलेल्या आहेत. आरसा X Y असा उभा धरलेला असतांना प्रश्न आकृतीची हुबेहूब आरसा प्रतिबिंब दर्शविणारी आकृती उजवीकडे दिलेल्या अ,ब,क,ड उत्तर आकृत्या मधून शोधा.









बरोबर उत्तर (ड) आहे.

## भाग-VIII (घडी घालून छिद्रे पाडून तयार झालेल्या आकृत्या(घडी घालणे,उलगडणे)

### निर्देश:

प्रश्न क्रमांक 29 ते 32 मध्ये डाव्या बाजूला प्रश्न आकृतीत दर्शविल्याप्रमाणे कागदाचा चौरस तुकडा घडी घालून त्याला छिद्रे पाडून कोपऱ्यातून कापलेले आहे. घडी उलगडल्यावर तो कसा दिसेल याची बरोबर आकृती उजव्या बाजूला दिलेल्या अ,ब,क,ड उत्तर आकृत्या मधून शोधा.








बरोबर उत्तर (अ) आहे.

## भाग-IX (तुकडे जोडून होणारी आकृती )

### निर्देश:

प्रश्न क्रमांक 33 ते 36 मध्ये डाव्या बाजूला एक प्रश्न आकृती तुकड्याच्या स्वरुपात दिलेली आहे. उजवीकडे अ,ब,क,ड उत्तर आकृत्या दिलेल्या आहेत. प्रश्न आकृतीची तुकडे जोडून हुबेहूब तयार होणारी आकृती उजवीकडे दिलेल्या अ,ब,क,ड उत्तर आकृत्या मधून शोधा.






(अ) (ब) (क) (ड)


**बरोबर उत्तर (ड) आहे.**

## भाग-X (इतर आकृतीत लपलेली आकृती शोधणे)

### निर्देश:

प्रश्न क्रमांक 37 ते 40 मध्ये डाव्या बाजूला एक प्रश्न आकृती दिलेली आहे. उजवीकडे अ,ब,क,ड उत्तर आकृत्या दिलेल्या आहेत. प्रश्न आकृती ज्या आकृतीत समाविष्ट (लपलेली) आहे, ती आकृती उजवीकडे दिलेल्या अ,ब,क,ड उत्तर आकृत्या मधून शोधा.





(अ) (ब) (क) (ड)

**बरोबर उत्तर (ब) आहे.**

### विभाग-2 अंकगणित चाचणी (Arithmetic Test)

या चाचणीचा मुख्य उद्देश उमेदवाराच्या अंकगणितातील मुलभूत क्षमता तपासणे हा आहे. या विभागातील 20 प्रश्न हे खाली दिलेल्या 15 घटकांवर आधारित असतील.

1. संख्या आणि संख्यालेखन पद्धती.
2. पूर्ण संख्यांवरील चार मुलभूत क्रिया.
3. अपूर्णांक आणि त्यावरील चार मूलभूत क्रिया.
4. अवयव व गुणक आणि त्यांचे गुणधर्म.
5. संख्यांचे ल.सा.वि आणि म.सा.वि.
6. दशांश अपूर्णांक आणि त्यावरील मूलभूत क्रिया.
7. दशांश आणि व्यावहारिक अपूर्णांक यांचे एकमेकात रुपांतर.
8. वस्तूंचे लांबी,,वस्तुमान,आकारमान, वेळ, पैसा, यांचे मापन करण्यासाठी संख्यांचावापर.
9. अंतर,काल, आणि गती यांचे मापन .

10. गणितीय सूत्रांचे अंदाजीकरण.
11. गणितीय सूत्रांचे सरलीकरण
12. शतमान आणि त्यांचे उपयोग.
13. नफा व तोटा यावरील उदाहरणे.
14. सरळव्याज यावरील उदाहरणे.
15. परिमिती,क्षेत्रफळ, घनफळ,(आकारमान) यावरील उदाहरणे.

नोंद- या चाचणीत गणितातील संबोध आणि कौशल्याचे आकलन व उपाययोजना यांच्या मूल्यमापानावर मुख्यत: भर देण्यात येईल. अंकगणितातील चाचणीच्या प्रश्नांच्या प्रकारची माहिती होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शनासाठी खाली काही उदाहरणे/नमुने दिले आहेत.

**उदाहरण: 1. (आकलन कसोटी)**

1000 या संख्येचे मूळ अवयव कोणते?

अ.10 x10 x 10 क.2 x 2 x 2 x 5 x 5

ब.2 x 5 x 5 x 10 ड.2 x 2 x 2 x 5 x 5 x 5

संख्यांचे मूळ अवयव काढताना दोन अटी (i) सर्व मूळ अवयवांचा गुणाकार दिलेल्या संख्येएवढा असला पाहिजे. (ii) प्रत्येक अवयव ही मूळ संख्या असावी. या ठिकाणी क्रमांक **ड.** चे उत्तर सर्व अटी पूर्ण करणारे आहे. म्हणून **ड.** हे बरोबर उत्तर आहे.

**उदाहरण: 2. (आकलन कसोटी)**

पहिल्या चार विषम संख्यांची सरासरी किती ?

अ.5 ब. 4 क. 7 ड. 16

पहिल्या चार विषम संख्या म्हणजे 1,3,5 आणि 7 या आहेत.त्यांची सरासरी (1+3+5+7)/4=4 येते. या ठिकाणी क्रमांक **ब.** चे उत्तर 4 आहे. म्हणून **ब.** हे बरोबर उत्तर.

**उदाहरण: 3. (उपयोजन कसोटी)**

एक किलोमीटर लांबीची एक मालगाडी प्रती किलोमीटर 3 मिनिट वेगाने धावते. या गाडीला 2 कि.मी. लांबीचा बोगदा पार करायला किती वेळ लागेल ?

अ.1 मिनिट क. 6 मिनिट

ब. 3 मिनिट ड. 9 मिनिट

वरील उदाहरणात बोगद्याची लांबी दोन किलोमीटर व आगगाडीची लांबी एक किलोमीटर दिली आहे. बोगदा ओलांडव्यास तीन किलोमीटर अंतर कापावे लागेल . गाडीचा वेग एक किलोमीटर ला ३ मिनिटे म्हणजे ३ किलोमीटर अंतर कापायला ९ मिनिटे वेळ लागेल. म्हणून**ड.** हे उत्तर बरोबर आहे.

## विभाग-3 भाषा चाचणी

या चाचणीचा मुख्य उद्देश उमेदवाराची वाचन –आकलन क्षमता तपासणे हा आहे. या चाचणीमध्ये चार परिच्छेद असून प्रत्येक परिच्छेदाखाली 5 प्रश्न दिलेले आहेत. विद्यार्थ्यांनी ते परिच्छेद काळजीपूर्वक वाचून प्रश्नांची उत्तरे द्यावीत. **खाली एक नमुना परिच्छेद आणि त्यावर आधारित प्रश्न दिले आहेत.**

**परिच्छेद**

जंगले आपल्यासाठी अनेक प्रकारे उपयुक्त आहेत. आपल्याला घर बांधण्यासाठी,लाकडी सामान बनविण्यासाठी, फर्निचर बनविण्यासाठी लाकूड मिळते. जंगले आपल्याला इंधन व कागद बनविण्यासाठी सुद्धा लाकूड देतात. ते पक्षी, प्राणी, व किटकांना निवारा देतात. जंगलामुळे पाऊस पडतो. जंगलाचे अस्तित्व हे पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी महत्त्वाचे आहे. पर्यावरणाची काळजी घेणे हे निर्विवाद आहे. पर्यावरण व त्यातील साधनसंपत्तीचा शहाणपणाने उपयोग करणे हे मानवाच्या अस्तित्वासाठी गरजेचे आहे.

1. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी ------------------ ची आवश्यकता आहे.

   अ. जंगले ब. मानव

   क. प्राणी ड. साधनसंपत्ती

   **बरोबर उत्तर:-अ.**

2. संवर्धन या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ------------------ हा आहे.

   अ.संरक्षण ब.निवारा

   क. निर्माण ड. विनाश

   **बरोबर उत्तर:-ड.**

3. खालीलपैकी 'शहाणा' या शब्दाचा समानार्थी अर्थ नसणारा शब्द कोणता आहे?

   अ. समंजस ब.विनोदी

   क. हुशार ड. समजूतदार

   **बरोबर उत्तर:- ब.**

4. सुतारकाम हे जंगलावर अवलंबून आहे कारण जंगले ---------------पुरवितात.

   अ. इंधनासाठी लाकूड क. लाकडी सामान बनविण्यासाठी लाकूड

   ब.कागद बनविण्यासाठी लाकूड ड. प्राण्यांसाठी आश्रय /निवारा

   **बरोबर उत्तर:- क.**

5. जंगली प्राणी बेघर होतील जर -----------------------------------

   अ.कागद कारखाने नष्ट केले तर ब.घरे बांधली तर

   क. जंगले नष्ट केली तर ड. पर्यावरणाची काळजी घेतली तर

   **बरोबर उत्तर:- क.**

# ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी काही महत्वाच्या सूचना

जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणीचा ऑनलाईन भरावयाचा अर्ज हा सुस्पष्ट व अगदी सरळ आहे. तरी अर्ज भरतांना पुढील सूचनांचे पालन करावे.

1. अर्जाचा नमुना व माहितीपत्रक कृपया काळजीपूर्वक वाचा. संपूर्ण अर्ज काळजीपूर्वक व पूर्णपणे भरा. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराचा जन्म **(01.05.2009 ते 30.04.2013)** या कालावधीत झाला आहे याची खात्री करून घ्या. तसेच इतर पात्रता अटी जसे इयत्ता 3,4,5 शासनमान्य /शासन संलग्न/शासन प्रमाणित/राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था मधील आहे याची खात्री करून घ्या.
2. ऑनलाईन अपलोड करण्यासाठी लागणारी कागदपत्रे जसे जातीविषयीची जसे सामान्य,अनु.जाति, अनु.जमाती, ओबीसी आणि दिव्यांग संवर्गाची, मुलगा/मुलगी तसेच शहरी/ग्रामीण इत्यादींची माहिती असणारे प्रमाणपत्र तयार करून मगच अर्ज भरा. जर प्रवेश घेतेवेळी या मध्ये तफावत आढळल्यास त्याची/तिची निवड अपात्र ठरू शकते.
3. अ) प्रवेश अर्जातील जन्मदिनांक आकड्यात आणि अक्षरी दोन्ही पद्धतीने लिहा. शाळेतील नोंदीनुसार तो बिनचूक लिहा. जन्मदिनांक शाळेतील नोंदीपेक्षा भिन्न आढळल्यास त्या उमेदवाराचा प्रवेश रद्द होऊ शकतो.<br>ब) कायमस्वरूपी असणाऱ्या जन्मखुणेचा उल्लेख प्रवेश अर्जामध्ये उमेदवाराने करणे आवश्यक आहे.
4. जवाहर नवोदय विद्यालयाच्या निवडचाचणीसाठी अर्ज करतांना उमेदवाराची तसेच पालकाची स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे.
5. ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत -**30 नोव्हेंबर 2021 ही आहे.**

**सावधान:-**

**अर्जातील कोणतेही सदर कोरे राहिल्यास अगर अपुरी /चुकीची माहिती भरल्यास तो अर्ज अपात्र समजून रद्द केला जाईल. उमेदवाराने अर्जातील सर्व अटींची पूर्तता (उदा: शिक्षण,वय,), विशेष संवर्ग (जसे अनुसूचित जाती/जमाती,अपंग), क्षेत्र (शहरी/ग्रामीण) या सर्व माहिती पूर्ण होत आहेत याची खात्री करून घ्यावी. उमेदवाराला प्रवेश मिळाल्यानंतर अर्जाची तपासणी करताना काही माहिती खोटी,अपुरी, भिन्न आढळल्यास त्याचा/तिचा प्रवेश रद्द करण्यात येईल. आणि याबाबतचा नवोदय विद्यालय समितीचा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील. याबाबतचा कोणताही पत्रव्यवहार नंतर करण्यात येणार नाही. तसेच एखाद्या उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी खोटी,चुकीची प्रमाणपत्रे , शपथपत्र/ माहिती दिल्याचे आढळून आल्यास त्याचा/ तिचा प्रवेश रद्द करण्यात येईल व विद्यार्थ्याकरिता करण्यात आलेला सर्व खर्च नवोदय विद्यालय समितीच्या नियमानुसार वसूल केला जाईल.**

# <u>रहिवासी प्रमाणपत्र</u>

**( * जे विद्यार्थी राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था (N.I.O.S.) अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रवेश घेऊ इच्छितात अशा निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतांना प्रस्तुत करावे.)**

जवाहर नवोदय विद्यालय ________________________________जिल्हा ___________________ राज्य_____________________ चे पत्र क्र.______________दिनांक_________________ नुसार माझा पाल्य कु./कुमारी _______________________________________________________चा/ची जवाहर नवोदय विद्यालय_______________________जिल्हा ___________________राज्य___________ च्या इयत्ता सहावीमध्ये शैक्षणिक वर्ष ________________ करिता प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून निवड झाली आहे. मी प्रमाणित करतो/करते की मी माझ्या पाल्यासोबत मागील ________________ वर्षापासून खालील पत्त्यावर रहात आहे.

*** निवास स्थानाचे क्षेत्र जिल्ह्यातील ग्रामीण/शहरी भागांतर्गत येते.**

गाव/शहर __________________________

तालुका __________________________

जिल्हा __________________________

राज्य __________________________

पिनकोड __________________________

मी असे प्रमाणित करतो/करते की वर दिलेली सर्व माहिती सत्य व खरी आहे. ही माहिती चुकीची किंवा दिशाभूल करणारी नाही.

पालकांची सही

पूर्ण नांव

पत्ता

ठिकाण _________________

दिनांक __________________

## <u>प्रमाणपत्र</u>

**(जिल्हाधिकारी / उपविभागीय दंडाधिकारी/तहसीलदार यांच्याद्वारे भरून ज.न.वि. प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी द्यावयाचे प्रमाणपत्र )**

प्रमाणित करण्यात येते की जवाहर नवोदय विद्यालय ______________________जिल्हा__________च्या इयत्ता सहावीसाठी निवड झालेल्या कु./कुमारी _____________________________ चे माता/ पिता श्री./श्रीमती________________________________च्या द्वारे वर दिलेली माहिती कार्यालयीन कागदपत्रांप्रमाणे सत्य/खरी आहे. त्यांचे निवास जेथे आहे ते गांव /शहर हे ग्रामीण/शहरी भागात आहे.

*** निवास स्थानाचे क्षेत्र जिल्ह्यातील ग्रामीण/शहरी भागांतर्गत येते.**

सही

तहसीलदार /उपविभागीय दंडाधिकारी

## जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी-2022
### प्रमाणपत्र

**ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तिथी 30 नोव्हेंबर 2021 ही आहे.**

| पासपोर्ट आकाराचे उमेदवाराचे छायाचित्र येथे चिटकवा |
|---|

प्रमाणित करण्यात येत आहे की, या अर्जात ______________________ (उमेदवाराचे नाव) जो इयत्ता 5 मध्ये ______________________ (शाळेचे नाव) या शाळेत शिकत आहे,त्या विषयी दिलेली माहिती सत्य आहे आणि तो नवोदय विद्यालय निवड चाचणी 2022 करिता अर्ज करण्यास इच्छुक आहे.

| | |
|---|---|
| उमेदवाराचे संपूर्ण नाव (ठळक अक्षरात) | |
| वडिलांचे नाव (ठळक अक्षरात) | |
| आईचे नाव (ठळक अक्षरात) | |
| पालकांचे नाव व त्यांचा उमेदवाराशी संबंध | |

| जन्म तारीख | अंकात | | | | | | | | अक्षरात |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | D | D | M | M | Y | Y | Y | Y | ................................................ |
| | | | | | | | | | |

| लिंग चिन्हांकित करा(✓) | मुलगा | मुलगी | तृतीयपंथी |
|---|---|---|---|
| | | | |

संवर्ग

| सामान्य | अनु.जाति | अनु.जमाती | ओबीसी (केंद्रीय यादीनुसार) |
|---|---|---|---|
| | | | |

अपंगत्वाचा प्रकार ,असल्यास.
योग्य प्रकारानुरूप (✓) अशी खुण करा.

| शारीरिक व्यंग | दृष्टीव्यंग | कर्णबधीर |
|---|---|---|
| | | |

जन्म खुण ........................................................................................................

**सध्याचा पत्ता**

मोबाईल क्र.. ............................. ई-मेल..................................

नागरिकत्व ................................. धर्म ...............................

परीक्षेचे भाषा माध्यम ..........................
(माहिती पुस्तिकेत राज्यनिहाय दिलेल्या भाषा माध्यमातून निवडावी)

| शाळेचा तपशील | इयत्ता-III | इयत्ता-IV | इयत्ता-V |
|---|---|---|---|
| (इयत्ता–III व IV शिकलेल्या आणि इयत्ता V शिकत असलेल्या) शाळेचे नाव व गावाचे/जागेचे नाव | | | |
| शाळेचे स्थान : ग्रामीण / शहरी | | | |
| प्रवेश घेतल्याचा महिना व वर्ष | | | |
| उत्तीर्ण झाल्याचे महिना व वर्ष | | | |
| गट/ तालुक्याचे नाव | | | |
| जिल्ह्याचे नाव | | | |
| राज्याचे नाव | | | |

मी असे प्रमाणित करतो की, माझा पाल्य ज्या शाळेत शिकला व शिकत आहे, त्या सर्व शासन मान्य आहेत. व तो न.वि.स.च्या नियमानुसार सर्व अटींची पूर्तता करीत आहे. मला हे ज्ञात आहे कि त्याने एक दिवस जरी इयत्ता III, IV व V शहरी विभागात असलेल्या शाळेतून शिक्षण घेतले असेल तर तो शहरी विभातील समजण्यात येईल.

**जर कुठल्याही टप्प्यावर वर दिलेल्या माहितीत विसंगती आढळल्यास प्रवेश घेतल्यानंतर ही त्याची उमेदवारी रद्द होईल. भविष्यात वर दिलेल्या माहितीत बदल करण्याची मी कुठलीही विनंती करणार नाही. ऑफलाईन व ऑनलाईन माहिती मध्ये तफावत आढळल्यास ऑनलाईन माहितीच योग्य व अंतिम धरली जाईल हे मला मान्य आहे.**

| उमेदवाराची स्वाक्षरी | पालकाची स्वाक्षरी |
|---|---|
| | |

**नोंद: NIOS विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यांचा ग्रामीण/शहरी स्तर हा निवास स्थानाच्या क्षेत्रावर आधारित असेल.**

## Performa for Other Backward Class (OBC) Certificate

**(CERTIFICATE TO BE PRODUCED BY OTHER BACKWARD CLASSES APPLYING FOR ADMISSION TO CENTRAL EDUCATIONAL INSTITUTIONS (CEIs), UNDER THE GOVERNMENT OF INDIA)**

This is to certify that Shri / Smt. / Kum. ________________________________________Son / Daughter of Shri / Smt. ______________________________ of Village / Town ____________________________ District / Division ________________________ in the ___________________________ State belongs to the ___________________________ Community which is recognized as a backward class under:

(i) Resolution No. 12011/68/93-BCC(C) dated 10/09/93 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 186 dated 13/09/93.
(ii) Resolution No. 12011/9/94-BCC dated 19/10/94 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 163 dated 20/10/94.
(iii) Resolution No. 12011/7/95-BCC dated 24/05/95 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 88 dated 25/05/95.
(iv) Resolution No. 12011/96/94-BCC dated 9/03/96.
(v) Resolution No. 12011/44/96-BCC dated 6/12/96 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 210 dated 11/12/96.
(vi) Resolution No. 12011/13/97-BCC dated 03/12/97.
(vii) Resolution No. 12011/99/94-BCC dated 11/12/97.
(viii) Resolution No. 12011/68/98-BCC dated 27/10/99.
(ix) Resolution No. 12011/88/98-BCC dated 6/12/99 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 270 dated 06/12/99.
(x) Resolution No. 12011/36/99-BCC dated 04/04/2000 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 71 dated 04/04/2000.
(xi) Resolution No. 12011/44/99-BCC dated 21/09/2000 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 210 dated 21/09/2000.
(xii) Resolution No. 12015/9/2000-BCC dated 06/09/2001.
(xiii) Resolution No. 12011/1/2001-BCC dated 19/06/2003.
(xiv) Resolution No. 12011/4/2002-BCC dated 13/01/2004.
(xv) Resolution No. 12011/9/2004-BCC dated 16/01/2006 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 210 dated 16/01/2006.
(xvi) Resolution No. 12011/14/2004-BCC dated 12/03/2007 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 67 dated 12/03/2007.
(xvii) Resolution No. 12018/6/2005-BCC dated 10/10/2007 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 311 dated 12/10/2007.
(xviii) Resolution No. 12015/2/2007-BCC dated 18/08/2010 published in the Gazette of India Extraordinary Part I Section I No. 232 dated 18/08/2010 & Corrigendum dated 11/10/2010.

Shri / Smt. / Kum. ____________________________________________ and / or his family ordinarily reside(s) in the ____________________________ District / Division of _________________________ State. This is also to certify that he / she does not belong to the persons / sections (Creamy Layer) mentioned in Column 3 of the Schedule to the Government of India, Department of Personnel & Training O.M. No. 36012/22/93-Estt. (SCT) dated 08/09/93 which is modified vide OM No. 36033/3/2004 Estt.(Res.) dated 09/03/2004 or the latest notification of the Government of India.

**Dated:**

**District Magistrate/ Competent Authority**

**Seal**

**NOTE:**

**(a)** The term 'Ordinarily' used here will have the same meaning as in Section 20 of the Representation of the People Act, 1950.

**(b)** The authorities competent to issue Caste Certificates are indicated below:

- **(i)** District Magistrate / Additional Magistrate / Collector / Deputy Commissioner / Additional Deputy Commissioner / Deputy Collector / Ist Class Stipendiary Magistrate / Sub-Divisional magistrate / Taluka Magistrate / Executive Magistrate / Extra Assistant Commissioner (not below the rank of Ist Class Stipendiary Magistrate).
- **(ii)** Chief Presidency Magistrate / Additional Chief Presidency Magistrate / Presidency Magistrate.
- **(iii)** Revenue Officer not below the rank of Tehsildar.
- **(iv)** Sub-Divisional Officer of the area where the candidate and / or his family resides.

**(c)** The annual income / status of the parents of the applicant should be based on financial year ending March 31, 2011.